Translated from Marathi to English

Proforma No 2

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

GOVT OF INDIA NOTARY

Document Noted & Registered
S.No. 392 2025
Page No to 22
Dated 17 JUL 2025

To,
Management

Zilla Parishad Nashik

Education Department (Primary)

Outward No.: Education/Primary -8/ 55/ 2025

Nashik, Date: 08/7/2025

Subject: As per the provisions under Section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, and Rule 4 of the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 – issuing of School Recognition Certificate.

Dear Sir/Madam,

Based on your application dated 04.07.2025 and the subsequent school inspection report conducted by the concerned education officers, the Education Officer (Primary), Zilla Parishad Nashik, after verifying the inspection report from 01.04.2025 to 31.03.2028, hereby grants provisional recognition Baglan Education Society's English Medium School located at Satana Tal. Baglan, Dist. Nashik, for Std. 1st to 8th for a period of three academic years, subject to the following terms and conditions:

The following conditions are applicable for the provisional recognition:

1. The recognition granted is provisional and cannot be claimed as a right under any circumstance by the institution/management.
2. The school must be operated in accordance with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 ( Annexure -1) and Maharashtra RTE Rules, 2011 (Annexure-2)
3. The School will admit children belonging to the weaker and deprived groups in the nearby vicinity up to 25% of the total intake capacity of 1st standard and impart them free and compulsory primary education. Further the school will also comply the same in pre-primary standards.
4. The school shall maintain a bank account for the purpose of receiving reimbursement under section 12(2) of the Act, in respect of the children mentioned in paragraph 3.
5. The school/institution shall not collect any capitation fees or screen children/parents for admission.
6. No child shall be denied admission on the basis of proof of age, caste, religion, gender, disability, or any other discriminatory grounds.
7. (i) Once admitted, no child shall be held back in the same class or expelled from the school until the completion of elementary education.
(ii) No child shall be subjected to physical punishment or mental harassment.
(iii) No child shall be required to attend any board examination before the completion of elementary education.
(iv) Every child who has completed primary education shall be given certificate as prescribed under rule 23.
(v) Students with disabilities / special needs shall be included in accordance with the provisions of the Act.
(vi) Teachers shall be appointed who possess minimum qualifications prescribed under section 23(1) of the Act Provided further that teachers who do not possess the minimum qualification on the date of commencement of the Act shall have to acquire such minimum qualification within the period of 5 years.
(vii) Teachers shall perform the duties specified in section 24 (1) of the Act, and
(viii) The school shall ensure that the teacher does not engage himself/ herself in private tutoring.
8. The school will follow the curriculum prepared on the basis of the syllabus prescribed by the appropriate authority.
9. The school shall admit students in proportion to the facilities available in the school as prescribed in Section 19 of the Act.
10. The school shall comply with the standards and norms specified in Section 19 of the Act. The facilities available in the school at the time of the last inspection were as follows:-

Area of the school premises: - 7.5 acres/ sq.m.

Total construction area: 22000.00 sq.m.

Area of the playground: - 400 x 373 sq.m.

Number of classrooms: - 41

Office-Storeroom-Principal's Room

Separate toilets for boys and girls with adequate water for use and to keep the toilets clean and hygienic.

Drinking water facility.

Kitchen for cooking lunch

Availability of teaching and learning materials/games and sports materials/library Reading materials are freely available.

11. Unapproved classes or groups cannot be run in the name of the school, on the school premises or elsewhere.

12. The school building or other structure or playground shall be used only for the purpose of education and skill development.

13. The school is being run by a society registered under the Societies Registration Act, 1860(18 of 21) or the Bombay Public Trusts Act, 1950.

14. The school is not run for the benefit of any individual, group or association of individuals or any other person or for the purpose of making any profit.

15. The accounts of the school should be audited and certified by a chartered accountant and proper accounts should be prepared as per the rules. A copy of each account should be sent to the District Education Officer every year.

16. Please note that the recognition code given to your school is RTE/BAG/PRY-55, which should be mentioned in any correspondence with this office.

17. The school shall submit such reports and information as the Director of Education/District Education Officer may request from time to time or shall comply with such instructions as the Government or local authority may give to ensure the continued fulfillment of the conditions of recognition of the school or to rectify any deficiencies in the functioning of the school.

18. Ensure that the organization's registration, if any, is renewed.

19. Other conditions as per Annexure Three are attached herewith.

20. The responsibility of final verification of whether the standards prescribed in terms of sections 18 and 19 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and Government Decision No. SSA/2013/Proc.75/Prashi 4 dated 29.06.2013 regarding physical facilities in schools are fulfilled or not will remain with the Education Officer (Primary) in the case of primary schools and with the Education Officer (Secondary) in the case of secondary schools.

21. The said approval is being given on the recommendation of the Group Education Officer, Panchayat. Samiti Baglan.

Education Officer (Primary)
Zilla Parishad Nashik

Copy:- Submitted for information,

1) Hon. Director of Education, Maharashtra State Pune.
2) Hon. Deputy Director of Education, Nashik Division Nashik

Translated By Mr.Nikam S.G. Marathi to English

**Head Master**
**B.E.S.English Medium School**
**Aral,Satana,Dist.Nashik**

GOVT. OF INDIA NOTARIAL NOTARIAL

Identified & ~~Drafted~~ by
Shri ______

Document Noted & Registered
S.No. 3921 2025
Page No to 21
Dated 17 JUL 2025

ATTESTED
SATISH R. CHINDHADE
ADVOCATE & NOTARY (Govt. of India)
SATANA (NASHIK) PIN-423301

NOTARY GOVT. OF INDIA
ADV SATISH R. CHINDHADE

## नमुना दोन

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र./शिक्षण/प्राथ-८/ ५४ /२०२५
नाशिक, दिनांक ८ / ७ /२०२५

**व्यवस्थापक :-**

**विषय- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम११, पोट नियम ४ अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत ...**

महोदय,

आपल्या दिनांक ०४.०७.२०२५ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेचे तपासणी याआधारे मी. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नाशिक, दिनांक** १.०४.२०२५ ते ३१.०३.२०२८ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधी साठी **इयत्ता १ ली ते ८ वी करिता- बागलाण एज्यु.सोसायटी, इंग्लिश मिडीयम स्कूल सटाणा ता.बागलाण जि.नाशिक** शाळेचे नांव, पत्या सह शाळेस तातपुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-**

१. मान्यतेचा कलावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यात कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करेल
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना , पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेत ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकरण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो त्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शरीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण हाईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षणपूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धार न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पाडतील , आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चित शाळा करील.

पुढील पानावर----

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रामच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- ७.५ एकर/ चौ.मी.
एकूण बांधकाम क्षेत्र :- २२०००.०० चौ.मी.
खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- ४०० x ३७३ चौ.मी.
वर्गखोल्यांची संख्या :- ४१
कार्यालय-नि-भांडार-नि-मुखाध्यापकाची खोली
मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल
पिण्याच्या पाण्याची सुविधा.
दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर
अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता
वाचन साहित्य विनासायास उपलब्ध

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण येतील.
१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८ चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमक , १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही
१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षण व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी.
१६. तुमच्याशाळेला मिळालेला मान्यता संकेतांक RTE/ BAG/PRY-55 असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावे. किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.
१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.
१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
२०. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या कलम १८ व १९ तसेच शासन निर्णय क्र. एसएसए/२०१३/प्रक्र.७५/प्राशि ४ दि. २९.०६.२०१३ अन्वये शाळांमधील भौतिक सुविधांबाबत विहित करण्यात आलेल्या निकषांची पूर्तता होते किंवा कसे? याची अंतिम खात्री करण्याची जबाबदारी प्राथमिक शाळांच्या बाबतीत शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांची व माध्यमिक शाळांच्या बाबतीत **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहिल.**
२१. सदरची मान्यता **गटशिक्षणाधिकारी, पं.स.बागलाण** यांचे शिफारशी अन्वये देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद नाशिक

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर,
१) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे.
२) मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग नाशिक

PRINCIPAL
B.E.S.ENGLISH MEDIUM SCHOOL
SATANA (NASHIK)

Manager
Baglan Education Society's English
Medium School,Satana (Nashik)